LATE. SHRIMANT SOU. UMABAISHAHEB PATWARDHAN SMARAK SANSTHA,MODNIMB

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संचलित मा.ह. महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब.ता.माढा जि.सोलापूर.

# WEL COME

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग सन 2022-23.

# Objectives

## राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे-

१)महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना समाजसेवा करणे.
२)आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन रचनात्मक कार्य करणे.
३)समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे. या उद्देशाने ही योजना सुरू झाली. तिचे प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे-१) ज्या समाजात आपण काम करतो, त्या समाजाला समजून घेणे.२) आपल्या शिक्षणाचा उपयोग व्यक्तिगत किंवा सामाजिक अडचणी दूर करून त्यावर व्यवहारीक उपाय शोधण्यासाठी करणे.३) आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करून तिचा विकास करणे.
४) नेतृत्व गुण धारण करून लोकशाही प्रवृत्तीचा विकास करणे.
५) राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार व विकास करणे.
६) समाजातील गरीब वर्गाची सेवा करण्याची इच्छा मनात जागृत करणे.

# Departmental Profile



**Head of Department:-** Prof.Suhas Pandurang Patil

**Qualification : -** **M. A Political Science / Programe Offi –N.S.S**

**Designation : -** **Associate Professor**

**Experience : -** 24 Years

# National Service Scheme Committee

| Sr. No. | Name of Member | Designation |
|---|---|---|
| 1 | Prof. Dr. S.T.Patil | Principle |
| 2 | Prof. S. P. Patil | Programe Officer |
| 3 | Prof.Dr. S. M. Gaikwad | Programe Officer |
| 4 | Dr. W.M. Jadhav | Member |
| 5 | Prof. Nilesh Mane | Member |
| 6 | Prof . Swati Bidve | Member |
| 7 | Shri .V. M. Surve | Staff Member |

# N.S.S –

बिल्ला- राष्ट्रीय सेवा योजनेच्या चिन्हावर आधारितच स्वयंसेवकांसाठी बिल्ला तयार केला आहे. स्वयंसेवक समाजात वेगवेगळे काम करताना किंवा वेगवेगळ्या कार्यक्रमात भाग घेताना हा बिल्ला आपल्या छातीवर लावतात. त्या बिल्याचा अर्थ खालील प्रमाणे-" बिल्याच्या मध्यभागी चाक असून,त्या चाकात आठ आरे आहेत. ते 24 तासांचे प्रतिनिधित्व करतात.( आष्टो प्रहर म्हणजे 24 तास).जी व्यक्ती हा बिल्ला लावते, तिला हा बिल्ला जाणीव करून देतो की, तो रात्रंदिवस 24 तास राष्ट्रसेवेसाठी तत्पर आहे.बिल्ला मधील लाल रंग हे तरुणांच्या उसळत्या रक्ताचे प्रतीक आहे. त्यातून उत्साह जोम किंवा जोश प्रतीत होतो. त्यातून जिवंतपणा दर्शवला जातो. निळा रंग हा आकाशाचे प्रतिनिधित्व करतो. अथांग आकाशातील एक अंश म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. हा बिल्ला लावला म्हणजे, स्वयंसेवक आपला थोडा वेळ मानव कल्याणासाठी देण्यास तयार होतो।“

." राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य व चिन्ह"" माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी"Not You,But Youबोधचिन्ह हे आपणाला सामाजिक बांधिलकीचे लोकशाहीचे जाणीव करून देते. व्यक्तिगत कल्याणामधून समाजाचे कल्याण होत असते. समाज हा अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला असतो.राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह हे ओरिसा राज्यातील कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. गतीमुळे सामाजिक परिवर्तन होऊ शकते. व त्यासाठी आजच्या महाविद्यालयीन युवक युवतींना राष्ट्रीय सेवा योजना हे माध्यम आहे. त्या माध्यमातून परिवर्तन करण्यासाठी हे चिन्ह घेतले आहे.

# N.S.S Programe

**"राष्ट्रीय सेवा योजना दिवस"**

राष्ट्रीय सेवा योजना दिवस म्हणून प्रत्येक वर्षी 24 सप्टेंबर हा दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत येणारे उपक्रम.

अ) नेतृत्व गुण विकास शिबिर

ब) आरोग्य तपासणी शिबिर

क) स्वच्छता अभियानड) वर्षभरातील महत्त्वाच्या दिवसांचे कार्यक्रमई) मतदार जनजागृती

**" विशेष श्रमसंस्कार शिबिर उपक्रम"**

अ) सामाजिक विषयावर जनजागृती उदा- हुंडा विरोधी कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह, लोकसंख्या इत्यादी.

ब) पर्यावरण, वृक्षारोपण, जलसंवर्धन, बंधारे बांधणे, रस्ते बांधणेक) साक्षरता अभियानड) राष्ट्रीय एकात्मता व सद्भावना कार्यक्रम.

**" राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे फायदे"**

१) स्वयंसेवकाचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होतो.

२) स्वयंसेवकाला सामाजिक समस्यांची जाणीव होते. व त्याचे निराकरण करण्याचे कौशल्य प्राप्त होते.

३) स्वयंसेवकाला स्वयंरोजगाराची दिशा मिळते.

४) शासनाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवते.

५) वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडवण्यात स्वयंसेवकाचा मोठ्या प्रमाणावर हातभार लागतो.

६) स्वयंसेवकांद्वारे समाजात रचनात्मक कार्य केली जातात. उदा- घर स्वच्छतागृहे, रस्ते, बंधारे बांधणे, वृक्षारोपण व संवर्धन यांची उभारणी केली जाते.

| Sr No | Date | Programme | Participants in Events |
|---|---|---|---|
| 1 | 25 मे 2022 | राज्यस्तरीय कार्यक्रमाधिकारी अधिवेशन जी20 | कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.एम गायकवाड. 26/5/2022 ते 27/5/2022 या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे अधिवेशनास उपस्थित |
| 2 | 4 जून 2022 | विभागीय कार्यशाळा विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय टेंभुर्णी | प्रा डॉ एस.एम. गायकवाड यांची उपस्थिती |
| 3 | 6 जून 2022 | जागतिक पर्यावरण दिवस | डॉ एस एम गायकवाड यांचे पर्यावरण विषयावर व्याख्यान झाले. |
| 4 | 10 जून 2022 | सायकल डे सकाळी आठ वाजता महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर | मा. प्राचार्य डॉ एस टी पाटील यांचे अध्यक्षतेखाली सायकल डे साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील 20 विद्यार्थी व दहा विद्यार्थीनींनी स्वतः सायकलवर महाविद्यालयात आले. यामध्ये स्टाफ ने सहभाग नोंदवला |
| 5 | 21 जून 2022 | जागतिक योगा डे | पतंजली योग प्रशिक्षक श्री मोहन कुंभार श्री  पवार व स्वयंसेविका राजनंदिनी शेळके यांनी सकाळी आठ वाजता योगाचे महत्व व योगासने प्रशिक्षण, महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये दिले |

| Sr No | Date | Programme | Participants in Events |
|---|---|---|---|
| 6 | 7 जुलै 2022 | कोविड लसीकरण कॅम्प | प्राथमिक आरोग्य केंद्र मोडनिंब व एनएसएस विभागांतर्गत लसीकरण कॅंप घेण्यात आला. 40 विद्यार्थ्यांना लस देण्यात आली. 20 कर्मचाऱ्यांनी बूस्टर लस घेतली. |
| 7 | 11 ऑगस्ट 2022 | वृक्षारोपण | महाविद्यालयाच्या प्रांगणात एनएसएस विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले |
| 8 | 12 ऑगस्ट 2022 | आजादी का अमृत महोत्सव | विविध स्पर्धांचे आयोजन. महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. |
| 9 | 19 ऑगस्ट 2022 | संस्था मातृदिनोत्सव उमाडे | उमाडे निमित्त गावातून शोभायात्रा काढण्यात आली. 50 विद्यार्थ्यांचा सहभाग. |
| 10 | 16 सप्टेंबर 2022 | महाडिक तात्या जयंती. | महाविद्यालयात फोटो पूजन करून डॉ संजय गायकवाड यांनी महाडिक तात्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.टी.पाटील होते. |

| Sr No | Date | Programme | Participants in Events |
|---|---|---|---|
| 11 | 23 सप्टेंबर 2022 | राष्ट्रीयप्रजासत्ताक संचालन निवड चाचणी | तीन स्वयंसेवकांची निवड.<br>१) रविकांत ताटे<br>२) कु राजनंदनी शेळके<br>३) प्रशांत माळी |
| 12 | 27 सप्टेंबर 2022 | राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन निवड चाचणी कोल्हापूर | संचालन निवडीसाठी कुमारी राजनंदिनी शेळके व प्रशांत माळी यांची निवड करण्यात आली |
| 13 | 2 ऑक्टोंबर 2022 | गांधी जयंती | निमित्त बेटी बचाव माता सुरक्षा सप्ताह शेटफळ प्राथमिक आरोग्य रुग्णालयास भेट. एनएसएस स्वयंसेविकांचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर. 30 स्वयंसेवकांचा सहभाग. |
| 14 | 19 ऑक्टोबर 2022 | राष्ट्रीय सेवा योजना | विभागाचे उद्घाटन डॉ जयंत करंदीकर कुर्डुवाडी यांचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवकांचे सामाजिक योगदान या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. |
| 15 | 2 नोव्हेंबर 2022 | वॉकिंग डे | मैदानावर. सर्व प्राध्यापक वृंद व एनएसएस स्वयंसेवक एक तास चालत चालले संपूर्ण स्वच्छता अभियान महाविद्यालय कॅम्पस स्वच्छता |

| Sr No | Date | Programme | Participants in Events |
|---|---|---|---|
| 16 | 17 नोव्हेंबर 2022 | कौशल्य व उद्योजकता विकास | आर्थिक साक्षरता या विषयावर हनुमंत भालेराव समुपदेशक- जिल्हा अग्रणी बँक सोलापूर यांचे मार्गदर्शन व्याख्यान झाले |
| 17 | 26 नोव्हेंबर 2022 | संविधान दिवस | सामाजिक न्याय पर्व दिन प्रा सुहास पाटील व डॉ संजय गायकवाड यांचे व्याख्यान. |
| 18 | 25 नोव्हेंबर 2022 | राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर | सोलापूर विद्यापीठ सोलापूर. १)प्रशांत प्रभाकर माळी २)कु.सुजाता साहेबराव मोरे ३)कुमारी आरती सुधीर मोरे या विद्यार्थ्यांचा सहभाग |
| 19 | 6 डिसेंबर 2022 | डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | वक्ते डॉ संजय गायकवाड |
| 20 | 4 जानेवारी 2023 ते 10 जानेवारी 2023 | विशेष श्रमसंस्कार शिबीर | शिबीर  उमा संकुल, विद्यालय परिसर, शिवाजीनगर मोडनिंब. |

# THANK YOU
# NOT ME - BUT YOU